**विशेष दिवाणी दावा क्र. १४८/२०२१**

निशाणी ५८ लगत

**(सदर साक्ष न्यायालयाच्या टी.व्ही वर प्रक्षेपित करण्यात आली.)**

**प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विधिज्ञ वकिल श्री. योगेश गोरे यांचेमार्फत वादी तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा उलटतपास शपथेवर सुरू....)**

उलटतपास नाकारला.

**प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ वकिल श्री. एस.के. राणे यांचेमार्फत वादी तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा उलटतपास पुन्हा शपथेवर सुरू....)**

मी लोणीवली येथे राहतो व वादी हे पाली खुर्द येथे राहतात. लोणीवली व पाली खुर्द यामधील अंतर १३ ते १४ किलोमीटर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे घर माझ्या घराला लागून नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर की वादी हे माझ्या शेजारी राहतात हा मजकूर मी खोटा लिहिलेला आहे. मला कोर्टाचे समन्स लागल्याची प्रत मी माझ्यासोबत आणलेली नाही. कोर्टाचे समन्सनुसार मला न्यायालयात ४ तारखेला म्हणजेच आज उपस्थित राहण्याचे समजले होते. मला कोर्टात साक्षीसाठी यायचे यासंदर्भात मी वादी म्हणजेच विनायक बांदल यांना भेटलो आहे. मी केसकामी वादी यांना समन्स मिळाल्यानंतर फोन केला व सांगितले की मला नोटीस मिळाली मी येतो परंतु मी त्यांना भेटलो नाही. मला विनायक बांदल यांचे पूर्ण फोन नंबर सांगता येणार नाही परंतु शेवटचा आकडा ६ आहे. जमीनीचा व्यवहार माझ्यासमोर झाला तेव्हा मी होतो यासंदर्भात साक्ष देण्यास मी आलो आहे. जमीनीचा व्यवहार काशिनाथ व त्यांचा भाउ लक्ष्मण या दोघांनी केला होता. जमीन विकली त्यावेळेस काशिनाथ व लक्ष्मण या दोघांच्याच नावावर जमीन होती. काशिनाथ व लक्ष्मणचे वडील बंडू आरिवले हे १९५६ साली मयत झाले किंवा कसे हे मला माहित नाही. ज्यावेळेस व्यवहार होतो त्यावेळेस जमीनीचा ७/१२ पाहिला जातो. ज्यांच्या नावावर ७/१२ उतारा आहे ती लोक खरेदीदाराला जमीन विकतात. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ साली काशिनाथ, लक्ष्मण व मी देखील प्रतिवादी क्र. ३ यांना सांगितले होते की, काशिनाथ व लक्ष्मण यांना आणखी एक बहिण आहे. सन २००८ साली काशिनाथ व लक्ष्मण यांनी दावा जमीनीचा व्यवहार केला याची माहिती मी वादींना दिली होती. सदरची माहिती मी वसंत बांदल यांना सांगितली होती.

त्यानंतर वसंत बांदल यांच्याशी माझी सुखदुखामध्ये भेटी झालेल्या आहेत. एक कोटी रूपयाचा व्यवहार ठरल्याबाबत पावर ऑफ अॅटर्नी झाली होती बाबी कागदपत्र बनविण्यात आले किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. सदरची जमीन ही कुळ कायदयातील जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, व्यवहाराची पूर्ण

रक्कम सहासष्ट लाख नव्यानव हजार हे साठेकराराच्या वेळी काशिनाथ व लक्ष्मण यांना देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, संपूर्ण रक्कम म्हणजेच सहासष्ट लाख नव्यानव हजार दिल्यामुळे काशिनाथ व लक्ष्मण म्हणजेच प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ च्या लाभांत नोंदणीकृत अखत्यारपत्र करून दिले. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ नंतर काशिनाथ व लक्ष्मण यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरूध्द कोणतीही तक्रार केली नाही. लडकूबाई बांदल यांना किती पैसे दयायचे होते याबद्दल मजकूर माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, लडकूबाईने वसंतच्या माध्यमातून २००८ पासून ते सन २०११ मध्ये पैसे मिळाले नाही अथवा हिस्सा मिळाला नाही म्हणून कोणताही दावा केलेला नाही. काशिनाथ व लक्ष्मण यांनी देखील वादीचा एक तृतीयांश हिस्सा मिळावा म्हणून प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरूध्द कुठेही दावा केलेला नव्हता.

माझ्या सांगण्याप्रमाणे माझे प्रतिज्ञापत्र वकीलांनी तयार केले. प्रतिज्ञापत्र तयार करत असतांना माझ्यासोबत कोणतेही कागदपत्र आणले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद ७/१२ उतारे व फेरफार याबद्दल मला माहिती नाही. स्पे.मु.नं ३६२/२०२१ हा दावा मी प्रतिवादी क्र. ३ यांच्याविरूध्द दाखल केला आहे. सदरच्या दाव्याकामी मी न्यायालयात हजर नसतो. सदर दाव्यामध्ये कंपनीला आजतागायत समन्स लागले नाहीत याची मला माहिती नाही. मी स्पे.मु. नं ३६२/२०२१ हा आम्हांला विचारात न घेता व आमची नावे कमी झाली म्हणून आमची नावे चढविण्यासाठी करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, या जमीनीचे ७/१२ सदरी याकूब बेग ट्रस्ट हे मालक होते. माझ्या प्रतिज्ञापत्रामध्ये जे दाव्याचे क्रमांक नमूद केले आहेत ते आम्हा सर्वांची प्रतिवादी क्र. ३ यांनी तथाकथित फसवणूक केली परंतु त्यांच्याविरूध्द आजतगागायत आम्ही त्यांच्याविरूध्द फसवणूकीची फौजदारी केस केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, लडकूबाई बांदल हिचा दावा मिळकतीमध्ये एक तृतीयांश हिस्सा आहे हे मी सांगण्याकरीता आलो आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील ज्या मागण्या लिहिलेल्या आहेत त्या वकीलांनी लिहिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला केसच्या काहीही माहिती नसतांना वादी यांनी सांगितल्याप्रमाणे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

UMA YASH BORADE KAPOOR

Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.04.04 17:50:58 +0530

दि. ०४/०४/२०२६

**(उमा वाय. बोराडे -कपूर)**

४ थे सहदिवाणी न्यायाधीश व स्तर, पनवेल